**म. हि.सं.कौ.का अर्ज क्र.२७/२०२४**
पल्लवी वि. दिनेश व इतर.
**निशाणी क्र. १८ खाली**

**अर्जदारतर्फे विद्वान वकील टी. व्ही. कोल्हे यांच्यामार्फत सरतपास शपथेवर सुरू.**

आता मला गट क्र. १९६, मौजा वडाळा महादेव, ता. श्रीरामपुर, जि. अहमदनगरचा जाबदारांच्या नावे असलेला ७/१२ उतारा दाखविण्यात आला. तो खरा व बरोबर त्यास **निशाणी क्र. ३४** देण्यात येते.

**सरतपास पूर्ण.**

**जाबदारतर्फे विद्वान वकील ए. एस. शेख यांच्यामार्फत उलटपास सुरू.**

हे म्हणणे खरे आहे की,जाबदार क्र. ४ ते ६ हे जाबदार क्र. १ ते ३ यांच्यापासून वेगळे म्हणजे एकरूखे, ता. राहता व जाबदार क्र. ६ चाचनळी, ता. कोपरगाव येथे राहतात. हे म्हणणे खरे आहे की, लग्नाच्या दुस–या दिवशी मला चक्कर आल्या होत्या. हे म्हणणे खरे आहे की, मी जेवण केले नसल्यामुळे मला चक्कर आल्या होत्या. हे म्हणणे खरे आहे की,लग्नाच्या दोन महिन्यानंतर मला आस्था हॉस्पीटल येथे ॲडमिट करण्यात आले होते. हे म्हणणे खरे आहे की, मी जेवत नसल्यामुळे मला अहमदनगर येथील पोटाच्या डॉक्टरांकडे उपचाराकरीता नेले होते. हे म्हणणे खरे नाही की, तेथे मला शिवण क्लाससुध्दा लावले होते.

प्रश्न : तुमच्या मानसिक उपचारासाठी तुमच्या नव–याने व वडीलांनी बराच खर्च केला आहे?

उत्तर : माझ्या वडीलांनी खर्च केलेला नाही. परंतु गरज नसताना मला नव–याने त्याचे उपचार दिले आहेत.

**जाबदारतर्फे वकीलांच्या तोंडी विनंतीवरून उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.**

श्रवणोत्तर स्विकृत,

Digitally signed by ANIKET ARUN KALAMKAR
Date: 2025.11.20 16:18:59 +0530

दिनांक : २०/११/२०२५
गंगापूर.

(अ. अ. कळमकर)
३ रे सहदिवाणी न्यायाधीश,क. स्तर
गंगापूर.